**गोपनीय/कालमर्यादा**

क्र. पोमसं/९(NGO)/७१३९/पीपीएम-पीएम(१५.०८.२०१६)/८४/१६,— १४८
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग
कुलाबा, मुंबई - ४०० ००१
दिनांक ११ /०२/२०१६

**विषय:- २०१६ च्या स्वातंत्र्यदिनी (१५.०८.२०१६) उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक व गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल पोलीस पदक मंजूरीकरीता पाठवावयाच्या शिफारशी...**

*****

**परिपत्रक :-**

उपरोक्त विषयांकित पदके मंजूरीकरिता केंद्र शासनाकडे पाठवावयाच्या शिफारशींबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाकडून दरवेळेस मार्गदर्शनपर सूचना निर्गमित करण्यात येतात. मागील प्रजासत्ताकदिन २०१६ च्या शिफारशीसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाकडील इंग्रजी परिपत्रक क्र. ११०१९/२९/२०१५-पीएमए, दिनांक १७ सप्टेंबर २०१५ अन्वये निर्गमित केलेल्या सूचनांची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे. त्या आधारे दिनांक १५.०८.२०१६ च्या स्वातंत्र्यदिनी घोषित करावयाच्या संभाव्य राष्ट्रपतींचे पोलीस पदक व पोलीस पदक यासाठी राज्य पोलीस दलातील पोलीस उप अधीक्षक आणि त्या खालील दर्जाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या शिफारशी मागविण्यात येत आहेत.

सर्व घटक प्रमुखांनी सोबतच्या केंद्र शासनाच्या परिपत्रकातील निकषानुसार अधिकारी / कर्मचाऱ्यांचे सेवा तपशिल तपासून उचित प्रस्ताव परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / अपर पोलीस महासंचालक यांच्या मार्फतीने निश्चितपणे दिनांक १५.०३.२०१६ पर्यंत या कार्यालयास पोहोचतील अशाप्रकारे पाठवाव्यात.

असे निदर्शनास आले आहे की, घटक प्रमुख हे केवळ त्यांच्या अधिनस्त कार्यकाळाचा विचार करुनच शिफारशी तयार करतात. मात्र पूर्वनेमणूकांच्या ठिकाणी काही प्रतिकूल बाबी असल्याची खात्री करीत नसल्यचे दिसून आले आहे. परिणामी अशा अधिकारी / कर्मचाऱ्यास पदक जाहीर झाल्यास ते काढून घेण्याची / रद्द करण्यासारखी नामुष्कीची कार्यवाही करावी लागू शकते, ही बाब पोलीस प्रशासनास मानहानीकारक ठरु शकते.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता पोलीस पदकासाठी शिफारशी पाठवितांना घटक प्रमुखांनी तसेच परिक्षेत्रीय स्तरावर, विभागीय स्तरावर तातडीने दखल घेण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना अंमलात आणाव्यात.

१) ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची उपलब्ध अभिलेखांच्या आधारे घटक प्रमुख स्तरावर निवड करण्यात येईल. त्या संबंधीतांकडून त्यांच्या पूर्वीच्या कोणत्याही नियुक्तीच्या ठिकाणी त्यांचेविरुध्द कोणतीही कसुरी / खातेनिहाय चौकशी / कसलाही गुन्हा दाखल / खटला न्यायप्रविष्ठ नसल्याबाबत व तसे भविष्यात निष्पन्न झाल्यास कोणत्याही कठोर शिक्षेस स्वत: जबाबदार राहील, असे स्वहस्ताक्षरातील आणि दिनांकीत स्वाक्षरीसह प्रतिज्ञालेख लिहून घेण्यात यावा व तो घटक प्रमुखाने प्रतिस्वाक्षरीत करुनच शिफारशीसह पाठवावा.

२) संबंधीतांच्या सेवापुस्तकात नोंद असली किंवा नसली तरीही त्याचेविरुध्द कोणत्याही प्रकारच्या शिक्षेचे आदेश अंमलबजावणीसाठी प्रलंबित नाहीत किंवा शिक्षेविरुध्दचे अपीलही प्रलंबित नाही याची खातरजमा करण्यात यावी.

३) घटक प्रमुखांच्या स्तरावरुन केल्या जाणाऱ्या सर्वच शिफारशी परिक्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाल्यावर केवळ त्यावर विसंबून न राहता त्यांची सेवापुस्ताकानुसार / वार्षिक गोपनीय अहवाल नस्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन व तसा स्वयंस्पष्ट शेरा नोंदवूनच या कार्यालयाकडे पाठवाव्यात.

४) गोपनीय अहवालाची प्रतवारी करतांना काही घटक प्रमुखांनी मूळ प्रतवारी न लिहीता अन्य प्रतवारी लिहिल्याचे दिसून आले आहे. मूळ शेऱ्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये. संबंधीत पोलीस अधिरी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल, बक्षिसे, शिक्षा पताका लावून दर्शविण्यात याव्यात. सदर शेऱ्यांची प्रतवारी खालील प्रमाणे करण्यात यावी.

**(पोलीस अधिकाऱ्यांसाठी सन २००५-२००६ ते २०१४-२०१५ व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सन २००६ ते २०१५)**

| | | |
|---|---|---|
| Outstanding<br>Excellent | अतिउत्कृष्ट | A+ |
| Very Good<br>Very Well | उत्कृष्ट / अतिउत्तम | A |
| Positively Good | निश्चित चांगला / उत्तम | B+ |
| Well<br>Good<br>Satisfactory<br>In turn<br>Fit | चांगला / समाधानकारक / पाळीप्रमाणे | B |
| Average / High enough | साधारण | B- |
| Below Average | साधारणपेक्षा कमी | C |

**उपरोक्त नमूद बाबींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यासारखी कठोर कारवाई करण्यात येईलच. परंतू त्याचबरोबर हलगर्जीपणाबद्दल शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यास सुध्दा व्यक्तिश: जबाबदार धरुन कारवाई केली जाईल याचीही नोंद घेण्यात यावी.**

आतापर्यंतच्या अनुभवावरुन असे निदर्शनास आले आहे की, काही घटक प्रमुख त्यांच्याकडील शिफारशी विहित केलेल्या मुदतीत न पाठविता आणि काही वेळा मुदत वाढवून दिल्यावरही त्या वाढीव मुदतीत प्रस्ताव सादर करीत नाहीत. तसेच घटकनिहाय आणि परिक्षेत्रनिहाय एकत्रित व एकाचवेळी प्रस्ताव न पाठविता वेगवेगळे प्रस्ताव आपापल्या सवडीनुसार पाठवितात. अशाप्रकारे स्वतंत्रपणे पाठविलेल्या प्रस्तावांची छाननी करण्यामध्ये आणि परिक्षेत्रनिहाय अभिलेख जतन करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. सबब, एका घटकाच्या शिफारशी एकाचवेळी एकदाच सादर कराव्यात. एका घटकाच्या वेगवेगळ्या शिफारशी प्राप्त झाल्यास फक्त अगोदर आलेल्या शिफारशी स्विकारण्यात येऊन नंतर आलेल्या शिफारशी स्विकारण्यात येणार नाहीत. काही घटक प्रमुखांकडून समितीच्या बैठकीच्या तारखेची माहिती मिळवून ऐनवेळी काही प्रस्ताव पाठविले जातात. अशावेळी सदर प्रस्तावांची छाननी करणे शक्य होत नाही. काही प्रस्तावासोबत पाठविलेली गोपनीय अहवालातील प्रतवारी आणि प्रत्यक्ष गोपनीय अहवालातील प्रतवारी भिन्न असल्याचे तर काही गोपनीय अहवाल अपुरे (उपलब्ध नसणे) असल्याचे दिसून आले आहे. अशाप्रकारच्या त्रुटींमुळे शिफारशींची काटेकोर छाननी करण्यास अधिक कालापव्यय होतो. या बाबी टाळण्यासाठी घटक प्रमुखांकडून पाठविण्यात येणारी प्रत्येक शिफारस परिपूर्ण, केंद्र शासनाकडील पात्रता निकष पूर्ण करणारी तसेच संपूर्ण कालावधीचे गोपनीय अभिलेख / सेवाभिलेख उपलब्ध असणारी अशी आवश्यक आहे. ज्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्याचे संपूर्ण वार्षिक गोपनीय अहवाल उपलब्ध नसतील अशांच्या शिफारशींचा विचार केला जाणार नाही. तसेच त्रुटींच्या पूर्ततेसाठी पत्रव्यवहार केला जाणार नाही. तरी सर्व घटक प्रमुखांनी आवश्यक ती खबरदारी घेऊनच शिफारशी पाठवाव्यात.

**पोलीस पदकाच्या शिफारशी online पाठविण्यात येत असल्याने अवतरण (Citation) हे फक्त २०० शब्द (१५ ते २० ओळी Special Character वगळून) मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. २०० शब्दांपेक्षा जास्त शब्दातील अवतरण परत करण्यात येईल आणि पात्र शिफारस शासनास पाठविली जाणार नाही, त्याची जबाबदारी ही संबंधीत घटकप्रमुखाची राहील. याची कृपया नोंद घेण्यात यावी.**